# ठाणेमहानगरपालिका, ठाणे

महानगरपालेकाभवन, डॉ.अल्मेडारोड, चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे-४००६०२.

दूरध्वनीः२५३३१२१९/२५३३१५९०


वृत्तविशेष क्र : 096 दिनांक : 24/03/2025

# 'तलावांचे संवर्धन आणि जतन ही आपल्या सगळयांची जबाबदारी'

**'तलावांचे ठाणे' या व्याख्यानात नूतन बांदेकर यांचे प्रतिपादन**
**ठाणे महापालिकेची विचारमंथन व्याख्यानमाला**

ठाणे महापालिका क्षेत्रातील तलाव हा आपल्या गौरवाचा विषय असून त्याचे संवर्धन जतन हे आजच्या आणि पुढच्या पिढ्यांसाठी करण्याची जबाबदारी आपल्याच खांद्यावर आहे. त्यामुळे डोळसपणे या तलावांकडे पाहूया आणि हे तलाव जपूया, असे प्रतिपादन 'मुक्काम पोस्ट तलाव' या पुस्तकाच्या लेखिका आणि ठाणे महापालिकेच्या शाळेतील प्रभारी मुख्याध्यापिका नूतन बांदेकर यांनी केले.

जागतिक वन दिन (२१मार्च), जागतिक जल दिन (२२मार्च) आणि जागतिक हवामान दिन (२३मार्च) यांच्या पार्श्वभूमीवर सोमवारी ठाणे महापालिकेतर्फे विचारमंथन व्याख्यानमालेत 'तलावांचे ठाणे' या विषयावर व्याखानाचे आयोजन करण्यात आले. व्याख्यानमालेचे हे १५वे पुष्प महापालिका मुख्यालय येथील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृह येथे संपन्न झाले.

तलावांचे प्रकार, निरोगी आणि आजारी तलावांची लक्षणे, तलावांचे जैवसाखळीतील महत्त्व याचे विवेचन नूतन बांदेकर यांनी केले. शिलाहार काळापासून ठाणे आणि परिसरातील ६० हून अधिक तलावांची नोंद इतिहासात आहेत. त्यापैकी, ४२ तलाव सध्या अस्तित्वात आहेत, असल्याचेही बांदेकर यानी सांगितले.

या प्रत्येक तलावाला सभोवतालच्या परिसराला भेट देऊन तलावांची माहिती घेतली. त्याच्या इतिहासाचा अभ्यास केला. त्यातून तलावांचे महत्त्व अधोरेखित झाले. आपण सगळयांनी या तलावांची काळजी घेतली पाहिजे. तलावांच्या स्थितीबाबत जागरूक राहिले पाहिजे. तलावात कचरा, मासे आणि पक्ष्यांना खाणे टाकले जाणार नाही, याची दक्षता घेतली पाहिजे असेही बांदेकर यांनी स्पष्ट केले.

मासुंदा तलावापासून वागळे इस्टेटमधील सीपी टँकपर्यंत सर्व तलावांचे सचित्र सादरीकरण बांदेकर यांनी या व्याख्यानात केले. ठाणे महापालिका आणि पर्यावरण दक्षता मंच यांच्या समन्वयाने सुरू असलेल्या 'माझा तलाव' या मोहिमेची माहितीही बांदेकर यांनी दिली.

या मोहिमेत तलावांना भेटी, तलावांबाबत जागरूकता आदी उपक्रम हाती घेण्यात येतात. त्यात विद्यार्थ्यांपासून सर्वच ठाणेकर मोठ्या उत्साहाने सहभागी होत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

व्याख्यानापूर्वी, उपायुक्त उमेश बिरारी, मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान यांच्या हस्ते नूतन बांदेकर यांचा शाल, स्मृतिचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या व्याख्यानाचे सूत्रसंचालन राजेंद्र पाटणकर यांनी केले.

**माझी वसुंधरा अभियानातंर्गत इ-प्रतिज्ञा**

या व्याख्यानाच्या निमित्ताने, मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान यांनी राज्य शासनाच्या माझी वसुंधरा या अभियानाची माहिती दिली. त्या अभियानात जनजागृतीसाठी नागरी सहभागावर भर देण्यात आला आहे. तसेच, नागरिकांनी इ-प्रतिज्ञा घ्यावी, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने, प्रधान यांनी सांगितल्याप्रमाणे उपस्थितांनी त्यांच्या मोबाईलवर इ-प्रतिज्ञा घेतली.